प्रधान लेखाशीर्ष २०५९ - हुतात्मा स्मारकांचे परिरक्षण व निगा या योजने अंतर्गत सन २०१८-१९ या वित्तीय वर्षात अनुदान वितरण.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक: हुस्माक १३१९/प्र.क्र.६६/२०१९
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २७ मार्च, २०१९

<u>वाचा</u> :- १) शासन निर्णय साप्रवि क्र. बीयुडी१३१५/प्र.क्र.२९४/स्वासैक-१ दि.५/०१/२०१७ व दि.१४/०३/२०१७.
२) शासन निर्णय साप्रवि क्र. बीयुडी१४१७/प्र.क्र. १७२/स्वासैक-१, दि. १४/०२/२०१८

प्रस्तावना :-

भारतीय स्वातंत्र्य लढा, हैद्राबाद मुक्ती संग्राम तसेच गोवा मुक्ती आंदोलन यामध्ये भाग घेऊन ज्यांनी देशासाठी प्राणार्पण केले, अशा व्यक्तींच्या स्मरणार्थ शासनाने राज्यात २०६ हुतात्मा स्मारके उभारलेली आहेत. सदर स्मारके बांधून आता ३४-३५ वर्षाचा कालावधी उलटून गेला असल्याने त्यांची दुरूस्ती/नूतनीकरण करणे आवश्यक असल्याने मा.मंत्री, वित्त,नियोजन व वने यांनी सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पीय भाषणात हुतात्मा स्मारकांची दुरूस्ती व नूतनीकरण करण्याकरिता रू. २५ कोटी नियतव्यय उपलब्ध करून देण्याची घोषणा केली होती. त्यानुसार हुतात्मा स्मारकाच्या दुरूस्ती/ नुतनीकरणासाठी आर्थिक वर्ष २०१६-१७ व २०१७-१८ मध्ये निधी सर्व संबंधित जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वाधीन करण्यात आला. अद्यापही काही हुतात्मा स्मारकांची कामे शिल्लक असल्याने संबंधित जिल्हाधिका-यांनी मागणी केलेली आहे. सन २०१८-१९ च्या हिवाळी अधिवेशनामध्ये रु. १२,००,००,०००/-(रु. बारा कोटी) इतका निधी मंजूर झाला असून त्यानुसार हुतात्मा स्मारकाच्या शिल्लक राहिलेल्या दुरुस्ती व नुतनीकरणासाठीचे अनुदान संबंधित जिल्हाधिका-यांच्या स्वाधीन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. यासंदर्भात शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय : -

प्रस्तावनेत नमुद बाब विचारात घेवून राज्यातील हुतात्मा स्मारकाच्या दुरूस्ती/ नुतनीकरणासाठी सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात उपलब्ध रू.१२,००,००,०००/-(रु. बारा कोटी) निधी राज्यातील २०६ हुतात्मा स्मारकांपैकी अपूर्ण हुतात्मा स्मारकांसाठी सन २०१८-१९ च्या हिवाळी अधिवेशनामध्ये मंजुर करण्यात आला आहे.

२. सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात लेखाशीर्ष २०५९ ००१५ अंतर्गत रुपये ५४,३८,४००/- एवढे अनुदान शासनाकडून जिल्हाधिकारी कार्यालय जालना यांना वितरीत करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी कार्यालय जालना यांनी सदरच्या अनुदानातील अखर्चिक रक्कम रुपये ३२,३८,४००/- चलनाद्वारे समर्पित करण्यात आल्याचे कळविले आहे.

३. आता जिल्हाधिकारी कार्यालय जालना यांनी १. मौ.पिंपळगाव कोलते तालुका भोकरदन येथील स्मारक दुरुस्ती काम दिनांक २७/०४/२०१८ रोजी पूर्ण करण्यात आलेले आहे तर २. मौ मानेगाव (गणेशपूर) तालुका जालना येथील काम अंतिम टप्प्यात असल्याचे कळवून सदर कामांचा निधी रक्कम रुपये ३२,३८,४००/- ची मागणी शासनास केलेली आहे.

४. जिल्हाधिकारी कार्यालय जालना यांना त्यांनी केलेल्या मागणी नुसार मौ. मानेगाव (गणेशपूर), मौ.कोलते पिंपळगाव ता. भोकरदन व वरूड ता. जाफराबाद येथील स्मारकांसाठी रुपये ३२,३८,४००/- एवढा निधी देण्यास हरकत नसावी. उपरोक्तप्रमाणे तीन स्मारकांसाठी शासनाकडून वितरीत करण्यात येत आहे. जिल्हाधिकारी कार्यालय जालना यांनी मिळालेल्या निधीचा उपयोग सदरील तीन कामांसाठीच करावा. जिल्हाधिकारी जालना यांनी स्मारकांसाठी निधी मुक्त करण्यापूर्वी स्मारकाच्या सद्यःस्थितीची पाहणी करावी. सदरील हुतात्मा स्मारकास निधीची आवश्यकता नसल्यास त्यासाठी निधी मुक्त करू नये. असा निधी जिल्हाधिकारी जालना यांनी आवश्यकता असल्यास जिल्ह्यातीलच इतर स्मारकांसाठी वळवावा किंवा शासनास चालू आर्थिक वर्ष संपुष्टात येण्यापूर्वी समर्पित करावा.तसेच संबंधीत जिल्हाधिका-यांनी वितरीत निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास तीन महिन्यात सादर करण्याबाबत कळविण्यास हरकत नसावी.

५. जिल्हाधिकाऱ्यांना वितरीत केलेल्या निधीतून खर्च केलेल्या अनुदानाच्या रकमांचा ताळमेळ महालेखापाल-१, मुंबई/महालेखापाल-२, नागपूर यांचेकडे विहित कालावधीत करुन खर्चमेळाचा मासिक अहवाल शासनास नियमितपणे सादर करावा. याप्रकरणी शासन परिपत्रक क्र. खर्चमेळ २०११/प्र.क्र.१३९/२०११/स्वासैक-१, दिनांक १६/८/२०११ नुसार कार्यवाही करावी.

६. याप्रित्यर्थचा चालू आर्थिक वर्षातील खर्च (अ) क्रमांक ए-४ २०५९- सार्वजनिक बांधकामे, (८०) सर्वसाधारण,०५३- परिरक्षण व दुरुस्ती (००) (०१) हुतात्मा स्मारकांचे परिरक्षण व निगा यासाठी सहायक अनुदान (२०५९ ००१५) या लेखाशीर्षाखाली सन २०१८-१९ या वित्तिय वर्षाच्या मंजूर अंदाजपत्रकीय तरतुदीतून भागविण्यात यावा आणि त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यांत यावा.

७. जिल्हाधिकारी जालना यांनी वितरीत निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास तीन महिन्यात सादर करावे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३२८१२२९३७१६०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Suresh Mahadeo Khade

Digitally signed by Suresh Mahadeo Khade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=14c299447f4a6e6c33ab3f7a85fbf010628981e82f8311a81d1cf974681485c2, serialNumber=f0b4c833a6fc7c6fb7cb0a96a3e2bb79d42d283b8f0f7bfc1ae95298d60bacf1, cn=Suresh Mahadeo Khade
Date: 2019.03.28 12:39:36 +05'30'

(सु. म. खाडे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव,
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३) सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक,

४) सर्व विधानमंडळ सदस्य, विधानमंडळ, मुंबई,
५) प्रधान सचिव व वि. चौ. अ. -१ यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
६) प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
७) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १, मुंबई,
८) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र २, नागपूर,
९) महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र १, मुंबई,
१०) महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र २, नागपूर,
११) विभागीय आयुक्त, औरंगाबाद.
१२) जिल्हाधिकारी, जालना,
१३) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना.
१४) उ.स. (स्वासैकक्ष), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,मुंबई ३२,
१५) अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना
१६) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना
१७) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई,
१८) जिल्हा कोषागार अधिकारी, जालना
१९) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२०) सामान्य प्रशासन विभाग, का.२५, मंत्रालय, मुंबई,
२१) क.अ. वित्त विभाग, (अर्थ संकल्प १३ / व्यय-४) मंत्रालय, मुंबई,
२२) निवड नस्ती (स्वासैक १).